महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

-विरुध्द-

अमित आणि अन्य एक.

(९जुलै, २००२)

[ सर्वश्री न्यायमूर्ती एन. संतोष हेगडे आणि बिशेश्वर प्रसाद सिंग.]

महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळ नियमावली, १९७७-नियम ५२ (३) (अ) टीप १ उपकलम २ (ड) आणि टीप २ उपकलम २ - उत्तरवादी क्रमांक १ हा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याचे अपीलकर्त्याने जाहीर केले असले तरी, त्याने राज्य स्तरावर खेळांमध्ये भाग घेतला होता, या आधारावर महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या नियमावली, १९७७ च्या नियम५२ च्या कलम (३) (अ) च्या टीप १ अंतर्गत उपकलम २ (ड) अंतर्गत २० सवलतीचे गुण(ग्रेस मार्क) मंजूर करण्यात यावे,यासाठी त्याने अपीलकर्ता मंडळाकडे अर्ज केला होता.

अपीलकर्ता मंडळाने २० ग्रेस गुणांची भर घालूनही, गणितात ५२ गुणांचे किमान उत्तीर्ण गुण मिळवण्यात तो अपयशी ठरल्यामुळे त्याला उत्तीर्ण घोषित केले जाऊ शकत नाही, या कारणावरून अपीलकर्त्या मंडळाने अर्ज फेटाळला.

उत्तरवादी ने कलम (३) (अ) च्या टीप १ अंतर्गत उपकलम (२) (ड) अंतर्गत आणि नियम ५२ च्या कलम (३) (अ) च्या टीप २ च्या उपकलम (३) अंतर्गत लाभ मिळवण्यास तो पात्र आहे,असा दावा करत बोर्डाच्या आदेशाविरूद्ध रिट याचिका दाखल केली.त्याचे म्हणणे असे होते की, गणितात त्याने प्रत्यक्षात मिळवलेल्या गुणांमध्ये ग्रेस गुण मिळविल्यानंतर, म्हणजे- १९, त्याने ३९ गुण मिळवले आहेत, असे मानले पाहिजे आणि म्हणूनच अपीलकर्ता गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये एकत्रित गुणाच्या आधारे उत्तीर्ण होण्याचा लाभ घेण्यास पात्र आहे. कारण, त्याने विज्ञान आणि गणितात एकत्रितपणे १०५ पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

उच्चन्यायालयाच्या मते, नियम ५२ च्या कलम (३) (अ) च्या टीप १ उपकलम २ (ड) अंतर्गत उत्तरवादी ला २० ग्रेस गुण देण्याचा अधिकार होता, उच्चन्यायालयाने याचिका मंजूर केली कारण,त्यांच्यामते ग्रेस मार्क्स विचारात घेऊन त्याचे गणितामध्ये एकूण ३९ गुण झाल्यास, तो नियम ५२ च्या कलम (३) (अ) च्या टीप २ च्या उपकलम (३) अंतर्गत गणित आणि विज्ञानात एकत्रितपणे १०५ पेक्षा जास्त गुण मिळवून लाभ घेण्यास पात्र असेल आणि म्हणून उच्च न्यायालयाने मंडळाला उत्तरवादी ला उत्तीर्ण घोषित करण्याचे निर्देश दिले.

या न्यायालया समक्ष केलेल्या अपीलात अपीलकर्त्या शिक्षण मंडळाने असा युक्तिवाद केला की, टिप २ चा उपकलम (३), ज्यामध्ये “उमेदवाराने १०५ पेक्षा कमी गुण मिळवणे” याचा संदर्भ आहे, तो उमेदवाराने परीक्षेत केलेल्या कामगिरीच्या आधारे प्रत्यक्षात मिळवलेल्या गुणांच्या अनुशंगाने आहे आणि अतिरिक्त ग्रेस गुण दिल्यानंतर त्याने गुण प्राप्त केल्याचे मानले जाते,त्या गुणांच्या संदर्भात नाही.

अपीलाला परवानगी देताना न्यायालयाने असा निष्कर्ष काढला की,

1. न्यायालयाला पाळावी लागणारी काही तत्त्वे आहेत.ज्या प्रकरणात ग्रेस मार्क्सचा दावा केला जातो, त्या प्रकरणाचा विचार करताना एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, संबंधित नियम,ग्रेस गुणांचा पुरस्कार, हा सवलतीच्या स्वरूपात असतो आणि यामुळे शैक्षणिक दर्जा कमी होतो यात शंका नाही.ज्या उमेदवाराने शैक्षणिक क्षेत्रा व्यतिरिक्त चांगली कामगिरी केली आहे परंतु; एक किंवा दोन विषयांतील गुणांच्या कमतरतेमुळे तो त्याच्या शैक्षणिक कारकीर्दीचे एक वर्ष गमावत आहे, अशा उमेदवाराची खरी अडचण दूर करणे हा ग्रेस गुण देण्याचा मूलभूत उद्देश आहे आणि म्हणून इतर विषयांमधील त्याच्या एकूण कामगिरी च्या आधारे तो यशस्वी घोषित होण्यास पात्र आहे.ज्या उमेदवाराने कोणत्याही विशिष्ट खेळात किंवा स्पर्धेत प्रविण्य प्राप्त केले आहे, अशा उमेदवारांने अशा खेळात किंवा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी बराच वेळ दिला असावा, हे लक्षात घेऊन सक्षम अधिकारी क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या उमेदवाराला ग्रेस मार्क्स( अनुदान म्हणून) देऊ शकतात. तथापि, ग्रेस गुण देण्याच्या नियमाचा काटेकोरपणे अर्थ लावला जाणे आवश्यक आहे.जेणेकरून हे सुनिश्चित होईल की योग्य कारणां शिवाय, विशेषतः निर्धारित केलेल्या मर्यादेच्या पलीकडे शिक्षणाचा दर्जा कमी होऊ दिला जाणार नाही.मात्र, अशा प्रकरणात, जेथे कायद्याची भाषा पूर्णपणे स्पष्ट आहे, तेथेच ग्रेस मार्क्स देण्याचा दावा मान्य केला जाऊ शकतो.सामान्यतः ग्रेस मार्क्सची सवलत वाढवण्यास आणि मंडळाच्या योग्य आणि

सक्षम अधिकाऱ्यांचा काहीही न देण्याचा विचार असल्यास,अशा प्रकरणात लाभ देण्यापूर्वी न्यायालय बराच विचार करेल.

[110-एफ, जी, एच; 111-ए, बी]

( शालेय शिक्षण मंडळ, हरियाणा विरुद्ध अरुण राठी आणि इतर, [१९९४] २ एस. सी. सी. ५२६ या न्यायनिर्णयांचा संदर्भ घेतला.)

2. महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नियमावलीतील नियम -५२ ची योजना आणि उच्च माध्यमिक मंडळाचे नियम, १९७७ स्पष्टपणे 'प्राप्त'केलेले किंवा 'मिळवलेले' गुण आणि 'दिलेले' ग्रेस गुण यात फरक करतात.सदर , टीप २ अंतर्गत उपकलम (३) विचारात घेतले, तर हे स्पष्ट होईल की, वरील नियम ग्रेस मार्क्स देण्याशी अजिबात संबंधित नाही.नियम ५२ ही एक सर्वसमावेशक तरतूद आहे आणि टीप २ अंतर्गत उपकलम (३) मात्र गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये एकत्रितपणे उत्तीर्ण होण्याचा लाभ देण्याशी संबंधित आहे,हे

संपूर्ण कलमावरुन स्पष्ट होते आणि त्याची सुरुवात ही “नियम ५२ च्या कलम (१), (२) आणि (३) (अ) मध्ये काहीही असले तरी” अशा शब्दांत झालेली आहे, त्यामुळे हे दिसते की,टीप-२च्या उपकलम(३)चा दर्जा “विशेष नियमा”चा आहे. यावरुन हे स्पष्ट होते की,कलम (१) आणि (२) च्या तरतुदींचा विचार करून एखादा उमेदवार उपकलम (३) (अ),उपकलम (३), कलम (क) अंतर्गत ग्रेस गुण मंजूर करूनही अन्यथा अनुत्तीर्ण झाला असता परंतु; टीप २ च्या उपकलम (३) अंतर्गत, गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये एकत्रितपणे गुणांचा लाभ मिळण्यास तो पात्र ठरल्यास, तसेच, त्याने उपरोक्त दोन विषयांमध्ये एकत्रितपणे १०५ पेक्षा

कमी गुण मिळवले नसतील तर, किंवा एखाद्या विषयात (अनुत्तीर्ण विषयांमध्ये) ३८ पेक्षा कमी गुण मिळवले नसतील तर तो ग्रेस मार्क्स मिळून उत्तीर्ण होईल.३८ पेक्षा कमी गुण मिळवणे म्हणजे, उमेदवाराने त्याच्या कामगिरीच्या आधारे परीक्षेत प्रत्यक्षात मिळवलेले गुण आणि ग्रेस गुणांची भर न घालता मिळवलेले गुण, असा त्याचा अर्थ होतो. सबब, टीप २ चा अर्थ लक्षात घेता, गणित विषयात केवळ १९ गुण मिळवणाऱ्या आणि सबब दुसरी अट पूर्ण न करणाऱ्या उत्तरवादी क्रमांक १ साररव्या उमेदवाराला उपकलम(३) कोणताही लाभ देत नाही.टीप २ चे उपकलम (३) उत्तरवादी क्रं.१ साररव्या उमेदवाराला कोणताही लाभ देत नाही.कारण, तो गणित विषयात ३८ पेक्षा कमी गुण मिळवून संयुक्त उत्तीर्णतेच्या लाभासाठी पात्र नाही.सबब,उपरोक्त तरतुदी खालील लाभ उत्तरवादी क्रमांक १ ला देऊ करतांना उच्च न्यायालयाने चूक केली आहे, हे उघड आहे.[115- जी, एच; 116-ए-डी]

न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की ग्रेस गुण देणे ही सवलतीची बाब आहे आणि त्यामुळे शैक्षणिक दर्जा कमी होतो. सबब,ग्रेस गुण देण्याशी संबंधित नियमांचा उदारपणे आणि मोकळेपणाने अर्थ लावला जाऊ नये; उमेदवारांना ग्रेस गुणांच्या माध्यमातून अनेक सवलती दिल्या जातात; उमेदवार ग्रेस गुण देण्यासाठी नियमांच्या विविध कलमांखाली पात्र ठरू शकतो आणि जर अनुत्तीर्ण उमेदवाराला सर्व कलमांखाली लाभ दिला गेला तर, त्यामुळे मंडळाने घेतलेल्या परीक्षेची खरोखरच थट्टा होईल.] [११६- एफ-जी; ११७-ब]

दिवाणी अपील न्यायाधिकारिता: दिवाणी अपील क्र. ३९६१/२००२

रिट याचिका क्रमांक ३१३१/२००१ मधील मुंबई उच्च न्यायनिर्णय ३-९-२००१ तारखेच्या न्यायनिर्णय आणि आदेशा विरुद्ध दाखल अपील.

अपीलकर्त्यांसाठी विधीज्ञ: दीपा चव्हाण, शरद अभ्यंकर, संतोष पॉल आणि एम. जे. पॉल.

उत्तरवादी साठी विधिज्ञ: अरुण पेडणेकर, व्ही. एन. रघुपती, एस. एस. शिंदे आणि एस. व्ही. देशपांडे.

(न्यायालयाचा न्यायनिर्णय न्यायमूर्ती बिशेश्वर प्रसाद सिंग यांनी पारीत केला.)

-: न्यायनिर्णय:-

विशेष अनुमती देण्यात आली.

अपीलकर्ता महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, हे महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळ कायदा, १९६५ अंतर्गत स्थापन केलेले मंडळ आहे.या अपीलात, अपीलकर्त्या शिक्षण मंडळाने, ३ सप्टेंबर २००१ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या रिट याचिका ३१३१/२००१ मधील दि.३सप्टेंबर,२००१च्या न्यायनिर्णय आणि आदेशावर आक्षेप घेतला आहे, ज्यामध्ये उच्च न्यायालयाने या ठिकाणचे उत्तरवादी क्रं.१ने दाखल केलेली रिट याचिका मंजूर केली होती आणि याचिकाकर्त्याला परीक्षेत उत्तीर्ण घोषित करण्याचे निर्देश मंडळाला दिले होते.उच्च न्यायालयाने असे मत मांडले की, नियम ५२ च्या कलम (३) (अ) च्या टीप १ अंतर्गत उपकलम २ (ड) अंतर्गत, उत्तरवादी क्रमांक १ हा २० ग्रेस गुणांच्या लाभास पात्र आहे, ज्याचा परिणाम असा आहे की, त्याने गणित विषयात मिळवलेले गुण ३९ होतील, जेंव्हा की,त्याने परीक्षेत मिळविलेले गुण १९ होते.त्ात ग्रेस गुण २० मिळवले असता, ग्रेस गुणांच्या जोडणीसह गणित विषयात ३९ गुण मिळवणारा उत्तरवादी क्रमांक १, नियम ५२ च्या कलम (३) (अ) च्या टीप २चा उपकलम (३) अंतर्गत पुढील लाभासाठी पात्र असेल, जर त्याने

गणित आणि विज्ञान विषयांमध्ये एकत्रितपणे १०५ पेक्षा जास्त गुण मिळवले असतील आणि त्यामुळे, उक्त तरतुदीनुसार गणित आणि विज्ञान विषयांमध्ये एकत्रित उत्तीर्ण होण्याचा लाभ मिळण्यास पात्र असेल.

आपण प्रथम त्या गोष्टी लक्षात घेऊ,ज्या बाबतीत वाद नाही.सरस्वती भुवन शाळेचा विद्यार्थी असलेला उत्तरवादी क्रमांक १ हा औरंगाबाद विभागीय मंडळाने मार्च, २००१ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेस बसला होता.२ जून २००१ रोजी निकाल जाहीर करण्यात आले. परंतु; उत्तरवादी क्र. १ याला अनुत्तीर्ण घोषित करण्यात आले, कारण त्याने गणित विषयात किमान ५२ गुणांपैकी फक्त १९ गुण मिळवले होते, जे उमेदवाराला त्या विषयात उत्तीर्ण होण्यासाठी नियमनाखाली मिळवणे आवश्यक आहे.त्यानंतर उत्तरवादी क्रमांक १ ने नियम ५२ च्या कलम (३) (अ) च्या टीप १अंतर्गत उपकलम २ (ड) अंतर्गत २० ग्रेस गुण मंजूर करण्यासाठी मंडळाकडे अर्ज केला.उत्तरवादी क्र.१ने राज्य पातळीवरील खेळांमध्ये भाग घेतला होता.असे दिसते की, उत्तरवादी क्रमांक १ ने राज्य स्तरावर "खो खो" स्पर्धेत भाग घेतला होता.उत्तरवादी क्रमांक १ चा अर्ज फेटाळण्यात आला आणि औरंगाबाद विभाग मंडळाच्या विभागीय सचिवांनी शाळेच्या मुख्याध्यापकांना हा निर्णय कळवला की, २० ग्रेस गुणांची भर घालूनही, उत्तरवादी क्रमांक १ उत्तीर्ण झाल्याचे घोषित केले जाऊ शकत नाही, कारण,ग्रेस गुणांची भर घालूनही तो गणित विषयात ५२ गुण मिळवण्यात अपयशी ठरला.मंडळाच्या सदर निर्णयामुळे व्यथित झालेल्या उत्तरवादी क्रमांक १ ने उच्च न्यायालयासमोर लेखी रिट याचिका दाखल केली, ज्या मध्ये त्याने नियम५२ च्या कलम (3) (अ) च्या टीप १ अंतर्गत, उप कलम २ (ड) अंतर्गत लाभ आणि उक्त कलम (३) (अ) च्या टीप २ च्या उपकलम (३) अंतर्गत लाभ

मिळवण्यासाठी दावा केला.मुळात, त्याचे प्रकरण असे होते की, त्याने गणितात प्रत्यक्षात मिळवलेल्या गुणांमध्ये २० ग्रेस गुण जोडल्यानंतर, [म्हणजे १९+२०=] त्याने ३९ गुण प्राप्त केले आहेत, असे मानले पाहिजे. गणित विषयातील गुण ३९ आणि त्यामुळे तो लाभासाठी पात्र झाला.तसेच, गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये तो एकत्रितपणे उत्तीर्ण झाला, कारण त्याने विज्ञान आणि गणित या विषयांमध्ये एकत्रितपणे १०५ पेक्षा जास्त गुण मिळवले होते.उच्च न्यायालयाने उत्तरवादी क्रमांक १ चा वरील युक्तिवाद मान्य केला, ज्याला मंडळाने आमच्यासमोर आव्हान दिले आहे.अपीलार्थी मंडळाने नियम तयार केले आहेत आणि नियम ५२, एखाद्या विषयात उत्तीर्ण होण्याचे मानक ठरवते.नियम ५२ चा बारकाईने अभ्यास केल्यास असे दिसून येते की, त्यात परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवाराने मिळवलेले किमान गुण, दिलेल्या परिस्थितीत उमेदवाराला मिळू शकणारे ग्रेस गुण आणि अशा गुणांची गणना करण्याची पद्धत, यांच्याशी संबंधित नियम सर्वसमावेशकपणे नमूद केले आहेत.तथापि, उपरोक्त विनियमाच्या तरतुदींकडे लक्ष देण्यापूर्वी, ज्या तत्वांवर ते आधारित आहेत,त्या तत्त्वांकडे लक्ष देणे योग्य असल्याचे आम्ही मानतो. ज्या संबंधित नियमांनुसार ग्रेस मार्क्सचा दावा केला जातो, अशा प्रकारच्या प्रकरणाचा विचार करतांना न्यायालयाने हे लक्षात ठेवले पाहिजे की,उमेदवाराला परीक्षेत उत्तीर्ण घोषित करण्यापूर्वी उमेदवाराने मिळवलेले किमान गुण, योग्य अधिकाऱ्यांद्वारे निर्धारित केले जातात, यात वाद नाही.ग्रेस गुणांचा पुरस्कार हा सवलतीच्या स्वरूपाचा असतो आणि त्यामुळे शैक्षणिक दर्जा कमकुवत होतो, यात शंका नाही.ज्या उमेदवाराने शैक्षणिक क्षेत्रा व्यतिरिक्त चांगली कामगिरी केली आहे. परंतु; एक किंवा दोन विषयांतील गुणांच्या कमतरते मुळे त्याच्या कारकीर्दीचे एक वर्ष गमावत आहे, अशा उमेदवाराची खरी अडचण दूर करणे, हा ग्रेस गुण देण्यामागील मूलभूत उद्देश आहे.तसेच,

तो इतर विषयांमधील एकूण कामगिरी च्या आधारे यशस्वी घोषित होण्यास पात्र आहे, हे योग्य अधिकारी देखील निश्चित करू शकतात.

ज्या उमेदवारांने कोणत्याही विशिष्ट खेळात किंवा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केले आहे, अशा उमेदवारांने अशा खेळात किंवा स्पर्धेत उत्कृष्टतेच्या शोधात बराच वेळ दिला असावा, हे लक्षात घेऊन, क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या उमेदवाराला ग्रेस गुण प्रदान करण्याची तरतूद केली आहे.तथापि, सवलतीच्या गुणांच्या पुरस्काराच्या नियमाचा काटेकोरपणे अर्थ लावला जाणे आवश्यक आहे, जेणेकरून शिक्षणाचा किमान दर्जा, योग्य सक्षम अधिकाऱ्यांनी विशेषतः निर्धारित केलेल्या मर्यादेच्या पलीकडे सौम्य करण्याची परवानगी दिली जाणार नाही.मात्र, अशा प्रकरणातच जेथे कायद्याची भाषा पूर्णपणे स्पष्ट आहे, तेथेच ग्रेस मार्क्स देण्यासाठीचा दावा मान्य केला जाऊ शकतो.सामान्यतः ग्रेस मार्क्सची सवलत वाढवण्यास आणि योग्य /सक्षम अधिकाऱ्यांचा काहीही न देण्याचा हेतू असल्यास, लाभ देण्यापूर्वी न्यायालय दोनदा विचार करील.(शालेय शिक्षण मंडळ, हरियाणा विरुद्ध अरुण राठी आणि इतर, [१९९४] २ एस. सी. सी. ५२६ पाहावे.

आता आपण नियमन ५२ चा विचार करू, ज्यावर दोन्ही पक्षांनी भर दिला आहे.नियम ५२, चा जो संबंधित भाग आहे, तो खालीलप्रमाणे आहेः-

"५२. एखाद्या विषयात उत्तीर्ण होण्यासाठीचे प्रमाण माध्यमिक शालेय प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी, उमेदवाराने देऊ केलेल्या प्रत्येक पर्यायी आणि शालेय प्रमाणपत्र विषयात किमान 'क' श्रेणी मिळवणे आवश्यक आहे.पर्यायी तांत्रिक विषयांच्या बाबतीत (शाखा २) ज्या मंडळाद्वारे परीक्षा घेतली जाते, उमेदवाराने किमान ३५ टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.तीन

भाषा शीर्षके आणि सामाजिक विज्ञान , ज्यांमध्ये प्रत्येकी जास्तीत जास्त १०० गुण देण्यात आले आहेत, त्यांच्या बाबतीत उमेदवाराने प्रत्येकी किमान ३५ गुण मिळवणे आवश्यक आहे आणि गणित आणि विज्ञानाच्या बाबतीत, ज्यांना प्रत्येकी जास्तीत जास्त १५० गुण देण्यात आले आहेत, उमेदवाराने प्रत्येकी किमान ५२ गुण मिळवणे आवश्यक आहे.

( २) ज्या विषयासाठी एकापेक्षा जास्त पेपर किंवा प्रात्यक्षिके असतात, त्या विषयातील 'उत्तीर्ण' होण्या साठी  गुण एकत्र जोडून विचारात घेतले जाऊ शकतील. कलम (३) ( अ) ची सूट किंवा सवलतीचा दावा न करता परिक्षेस बसणाऱ्या  उमेदवारांना एखाद्या विषयात किंवा जास्त विषयांत उत्तीर्ण होण्याच्या उद्देशाने त्यांची गुणांची कमतरता, खाली नमूद केल्याप्रमाणे २ किंवा ३ गुणांपर्यंत असल्यास, गुणांची आपोआप माफी दिली जाईल.

खाली नमूद मर्यादेत  गुणांमध्ये आपोआप माफी दिली जाते-

( अ) प्रथम भाषा-२

(२) दुसरी भाषा -२

(३) तिसरी भाषा-२

(४) सामाजिक विज्ञान-२

( ५) गणित-३

(६) विज्ञान-३

(७) गणित आणि विज्ञान (संयुक्त उत्तीर्णतेची तरतूद लागू करताना)

(८) दोन भाषांऐवजी, मूक आणि कर्णबधिर उमेदवारांनी

देऊ केलेले दोन विषय- २ गुण (प्रत्येक विषयात)

टीपः( १) गुणांच्या मर्यादेपेक्षा जास्त गुण आवश्यक असल्यास सूचित करा. वरील विषय किंवा विषयात उत्तीर्ण होण्याच्या उद्देशाने विषय किंवा विषयांमध्ये गुणांची आपोआप माफी दिली जाणार नाही.

( २) ( अ) कलम (३) च्या उपकलम (अ) मध्ये विहित केलेल्या अटींच्या अधीन राहून, उमेदवारांना एक किंवा अधिक अनिवार्य विषय किंवा विषयातील गुणांच्या आपोआप माफीचा लाभ मिळू शकतो.

( ब) उमेदवारांना उर्वरित अनुत्तीर्ण अनिवार्य विषयांमध्ये (ज्यामध्ये कमतरता उपकलम (३) (अ) मध्ये दर्शविलेल्या २ किंवा ३ गुणांच्या मर्यादेपेक्षा जास्त आहे) उत्तीर्ण होण्याच्या उद्देशाने, मात्र, तीन विषयांपुरते मर्यादित, जास्तीत जास्त २० ग्रेस गुणांपर्यंत, कोणत्याही एका विषयात दहा टक्क्यांपेक्षा जास्त (त्या विषयासाठी जास्तीत जास्त गुणांच्या) ग्रेस गुण दिले जातील, या अटीच्या अधीन राहून, ग्रेस गुण मंजूर केले जातील;

( क) वरील उपकलम (ब) मध्ये काहीही असले तरी, अंध किंवा बहिरे आणि मूक किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग किंवा स्पॅस्टिक उमेदवारांच्या बाबतीत, जास्तीत जास्त १० टक्के ग्रेस गुणांची मर्यादा २० ग्रेस गुणांपर्यंत वाढवली जाईल.

( ड) वरील उपकलम (ब) मध्ये काहीही असले तरी, ज्या उमेदवाराने त्याच शैक्षणिक वर्षात भारतात किंवा परदेशात किंवा राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या कोणत्याही

खेळात किंवा खेळांमध्ये प्रत्यक्षात भाग घेतला असेल, तर जास्तीत जास्त १० टक्के ग्रेस गुणांची मर्यादा २० ग्रेस गुणांपर्यंत वाढवली जाईल परंतु;त्यासाठी संबंधित उमेदवाराने माध्यमिक शिक्षण संस्थेच्या संबंधित प्रमूखांमार्फत अशी विनंती केली असेल, जेणेकरून निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून एक महिन्यापूर्वी त्यांना संबंधित विभागीय मंडळाच्या विभागीय सचिवांशी संपर्क साधता येईल. असे सर्व अर्ज निश्चितपणे जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रासह विहित नमुन्यात संबंधित विभागीय मंडळाच्या विभागीय सचिवांकडे सादर केले जातील.

कलम (ई) आणि (एफ) हे मुख्यत्वे कलम (डी) सारख्याच अटींमध्ये आहेत आणि ज्या उमेदवारांनी प्रत्यक्षात प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात, राष्ट्रपतींची रॅली इत्यादीं मध्ये भाग घेतला आहे त्यांना ग्रेस गुणांचा समान लाभ देतात.

त्यानंतर टीप 2 खालीलप्रमाणे आहेः-

" टीप २:( १) उमेदवाराला कलम (३) च्या उपकलम (२), टीप १ च्या उपकलम (अ) आणि (ब) अंतर्गत केलेल्या दोन्ही तरतुदींचा लाभ मिळू शकतो, परंतु एकाच विषयात नाही.

( २) टीप १, उपकलम (२) च्या उपकलम (अ) आणि (ब) मध्ये केलेल्या तरतुदी किंवा उपकलम (3) च्या या दोन्ही तरतुदी लागू केल्यानंतरही परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या उमेदवाराला गुणांची किंवा ग्रेस गुणांची आपोआप माफी दिली जाणार नाही.

( ३) उपकलम (१), (२) आणि (३) (अ) मध्ये काहीही असले तरी, एकाच आणि एकाच माध्यमिक  शाळा प्रमाणपत्र परीक्षेत गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये किमान १०५ गुण मिळवणारा आणि विषय किंवा अनुत्तीर्ण विषयांमध्ये किमान ३८ गुण मिळवणारा उमेदवार गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये एकत्रित उत्तीर्ण होण्याचा लाभ घेण्यास पात्र असेल.

( ब) सूट असलेल्या उमेदवारांना खाली दिलेल्या तपशीलानुसार उत्तीर्ण होण्याच्या उद्देशाने गुणांची  माफी आपोआप दिली जाईलः.

माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेत उमेदवाराला खालील वेळापत्रकानुसार कोणत्याही एका विषयातील अनुत्तीर्ण विषयांच्या संख्येच्या किमान,  परंतु ३ गुणांपेक्षा जास्त नसेल, अशी कमाल १३ गुणांची  माफी आपोआप दिली जाईल.

| विषयांची संख्या | मिळू शकणारे सवलतीचे गुण |
|---|---|
| १. | ३. |
| २. | ५. |
| ३. | ८. |
| ४. | १०. |
| ५. | १३. |

टीप ३:गणित किंवा विज्ञान या दोन्हींमध्ये सूट मिळालेला उमेदवार विज्ञान आणि गणितात एकत्रित उत्तीर्ण होण्याचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.

टीप ४:इतर विषय किंवा विषयांमध्ये सूट मिळालेला आणि एकाच परीक्षेत गणित आणि विज्ञान विषयात बसलेला उमेदवार संयुक्त उत्तीर्णतेचा नियम लागू करताना माध्यमिक शालेय प्रमाणपत्राच्या उद्देशाने ५ गुणांच्या मर्यादेपर्यंत आपोआप सवलतीच्या गुणांचा लाभ घेण्यास पात्र असेल.

( ४) तांत्रिक किंवा अनुत्तीर्ण झालेल्या इतर पर्यायी विषयांमध्ये कोणतेही माफी गुण किंवा ग्रेस गुण दिले जाणार नाहीत.

नियम ५२ च्या योजनेचा सखोल अभ्यास केल्यास असे दिसून येते की, नियम ५२ च्या कलम (१) आणि (२) अंतर्गत प्रत्येक विषयातील किमान उत्तीर्ण गुण निर्धारित केले गेले आहेत.गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये (ज्यांना प्रत्येकी जास्तीत जास्त १५० गुण देण्यात आले आहेत) उमेदवाराने प्रत्येक विषयात किमान ५२ गुण मिळवणे आवश्यक आहे, अशी स्पष्ट तरतूद या नियमात आहे.

कलम ३ (अ) मध्ये गुणांची आपोआप माफी देण्याची तरतूद आहे.विषय उत्तीर्ण करण्याच्या उद्देशासाठी अशी आपोआप माफी किती प्रमाणात दिली जाऊ शकते, हे त्यात नमूद केले आहे.गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये (संयुक्त उत्तीर्णतेची तरतूद लागू करताना) सहा गुणांची आपोआप माफी स्वीकारली जाते.प्रत्येक विषयातील तीन गुणांची आपोआप माफी स्वतंत्रपणे स्वीकारली जाते.अपीलकर्त्याच्या बाबतीत, त्याने गणितात मात्र १९ आणि विज्ञानात ११२ गुण मिळवले यात वाद नाही.आपोआप माफी/सवलत देण्याच्या तरतुदीनुसार, तो गणित विषयात तीन गुण मिळवण्यास पात्र असेल ज्यामुळे तो उत्तीर्ण गुण मिळवू शकणार नाही.कलम (३) (अ) चे उपकलम २(ब) उमेदवारांना अनुत्तीर्ण झालेल्या उर्वरित अनिवार्य

विषयांमध्ये उत्तीर्ण होण्याच्या उद्देशाने अतिरिक्त लाभ देते, ज्यामध्ये कलम ३ (अ) मध्ये दर्शविल्याप्रमाणे २ किंवा ३ गुणांच्या मर्यादेपर्यंत, २० ग्रेस गुणांच्या पुढे जी गुणांची कमतरता असते, परंतु ती मात्र तीन विषयांपुरती मर्यादित असेल आणि कोणत्याही एका विषयात त्या विषयाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त गुण दिले जाणार नाहीत, या अटीच्या अधीन राहून,उपकलम (ड) अंतर्गत ज्या उमेदवाराने त्याच शैक्षणिक वर्षात भारतात किंवा परदेशात राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या कोणत्याही खेळात किंवा खेळांमध्ये भाग घेतला आहे, अशा उमेदवारासाठी जास्तीत जास्त १० टक्के ग्रेस गुण २० ग्रेस गुणांपर्यंत वाढवण्यात आले आहेत.उत्तरवादी क्रमांक १ ने उपकलम (ड) अंतर्गत लाभासाठी दावा केला आणि तो त्या लाभासाठी पात्र आहे यात वाद नाही. तरीही उत्तरवादी क्र.१ ला गणित विषयात २० ग्रेस गुण मिळाल्यानंतर त्याला ५२ पैकी फक्त ३९ गुण मिळाले असते, जे गुण उत्तीर्ण होण्यासाठीचे किमान गुण आहेत.

तथापि, उत्तरवादी क्रमांक १ चे प्रकरण असे आहे की, एकदा त्याने गणित विषयात मिळवलेल्या गुणांमध्ये २० ग्रेस गुण जोडले की, त्याने त्या विषयात प्रत्यक्षात ३९गुण मिळवले आहेत असे मानले पाहिजे.त्यानंतर तो टीप २ उपकलम (३) वर ब वर अवलंबून राहतो आणि असा युक्तिवाद करतो की, त्याने विज्ञानात प्राप्त केलेल्या गुणांमध्ये गणितात मिळवलेले जोडल्यास होणारे गुण हे १०५ पेक्षा जास्त असल्याने, त्याला गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये एकत्रित उत्तीर्ण होण्याचा लाभ मिळण्याचा हक्क आहे.

दुसरीकडे, अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांनी नमूद केले आहे की, टीप २ चे उपकलम (३) ज्यामध्ये 'उमेदवाराने १०५ पेक्षा कमी गुण मिळवणे' याचा संदर्भ आहे, तो उमेदवाराने परीक्षेत केलेल्या कामगिरीच्या आधारे प्रत्यक्षात मिळवलेल्या गुणांच्या संदर्भात आहे आणि ग्रेस गुण दिल्यानंतर त्याने प्राप्त केल्याचे मानले जाणाऱ्या गुणांच्या संदर्भात नाही,असा त्यांनी युक्तिवाद केला आहे  आणि आमच्या मते, टीप २ चे उपकलम (३) स्पष्टच आहे, आणि ते कोणताही गोंधळ किंवा वाद होऊ देत नाही.हा नियम स्पष्टपणे 'मंजूर' आणि 'प्राप्त' गुणांमध्ये फरक करतो. जेंव्हा हा नियम एखाद्या उमेदवाराने मिळवलेल्या गुणांचा संदर्भ देते, तेव्हा तो परीक्षेत त्याच्या कामगिरीच्या आधारे त्याला देण्यात आलेल्या गुणांचा संदर्भ देतो.परंतु;जेंव्हा जेंव्हा तो दिलेल्या गुणांचा संदर्भ देतो, तेंव्हा तो उमेदवाराला सवलत म्हणून दिल्या जाणाऱ्या ग्रेस गुणांच्या संदर्भात असतो.सबब, त्यांनी सादर केले की, टीप २ च्या उपकलम (३) चा लाभ मात्र अशा उमेदवाराला दिला जाऊ शकतो, ज्याने गणित आणि विज्ञान या एकत्रित विषयांमध्ये परीक्षेत प्रत्यक्षात १०५ गुण मिळवले आहेत आणि अनुत्तीर्ण विषयात ३८ पेक्षा कमी गुण मिळवलेले नाहीत.जोपर्यंत उत्तरवादी चा संबंध आहे, टीप २ च्या उपकलम (३) च्या उद्देशाने, तो अनुत्तीर्ण झालेल्या विषयात, म्हणजे गणितामध्ये ३८ पेक्षा कमी गुण मिळवले आहेत असे मानले पाहिजे. कारण, त्याने प्रत्यक्षात मात्र १९ गुण मिळवले आहेत.अपीलकर्त्यातर्फे करण्यात आलेल्या  युक्तिवादात आम्हाला बरेच तथ्य आढळून आले आहे आणि तो युक्तिवाद मान्य केला पाहिजे. नियम ५२ हा उत्तीर्ण गुणांचा संदर्भ देतो, जे उमेदवाराने "मिळवणे आवश्यक आहे" किंवा "सुरक्षित करणे आवश्यक आहे".कलम (३) (अ) जे आपोआप सवलत  देण्याशी संबंधित आहे, त्यात "गुणांची आपोआप माफी दिली जाईल" या शब्दांचा वापर केला आहे.त्याच प्रमाणे,  नियम ३ (अ) च्या उपकलम (२) च्या कलम (ब) मध्ये जे शब्द वापरले

आहेत,ते “ हे देखील मंजूर केले जातील” असे आहेत आणि कलम 'क' ते ‘फ’ नुसार २० गुणां पर्यंत ग्रेस मार्क्स दिले जाऊ शकतात.टिप २ उपकलम (२) अंतर्गत, जी गुणांच्या आपोआप माफीशी संबंधित आहे, संदर्भ "मंजूर केलेल्या" गुणांचा आहे.त्यामुळे, नियमांची योजना अगदी स्पष्ट आहे आणि त्यात 'प्राप्त' किंवा 'सुरक्षित' गुण आणि 'मंजूर' केलेल्या ग्रेस गुणांमध्ये स्पष्टपणे फरक केला आहे.या अनुषंगाने जर आपण बघीतले तर असे दिसते की, टीप २ अंतर्गत उपकलम (३) चा विचार करता हे स्पष्ट होते की, वरील उपकलम ग्रेस मार्क्स देण्याशी अजिबात संबंधित नाही.नियम५२ ही एक सर्वसमावेशक तरतूद आहे आणि टीप २ अंतर्गत उपकलम (३) मात्र गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये एकत्रितपणे उत्तीर्ण होण्याचा लाभ देण्याशी संबंधित आहे.ते अबाधित कलमाने सुरू होते आणि “नियम ५२ च्या कलम (१), ब (३) आणि (३) (अ) मध्ये काहीही असले तरी”अशा शब्दयोजने वरुन ते कलम 'विशेष नियम 'मांडते.ही गोष्ट स्पष्टपणे सूचित करते की, जरी एखादा उमेदवार कलम (१) आणि (२ )च्या तरतुदींचा विचार करून, उपकलम (३) (अ) अंतर्गत ग्रेस गुण मंजूर करूनही अन्यथा अनुत्तीर्ण झाला असता, तरीही टीप २च्या उपकलम (३) अंतर्गत त्याला गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये एकत्रित उत्तीर्ण होण्याचा लाभ मिळण्याचा हक्क आहे.परंतु; त्याने उपरोक्त दोन विषयांमध्ये एकत्रितपणे कमीतकमी सी १०५ गुण मिळवले असतील, तर विषयात किंवा अनुत्तीर्ण विषयांमध्ये कमीतकमी ३८ गुण मिळवले असतील.आम्ही आधीच असे म्हटले आहे की ३८पेक्षा कमी गुण मिळवणे म्हणजे उमेदवाराने त्याच्या कामगिरीच्या आधारे आणि ग्रेस गुणांची भर न घालता परीक्षेत प्रत्यक्षात मिळवलेले गुण होय.सबब टीप २ चा अर्थ लावलेला उपकलम (३), गणिताच्या विषयात मात्र १९ गुण मिळवणाऱ्या आणि सबब दुसरी अट पूर्ण न करणाऱ्या उत्तरवादी क्रमांक १ सारख्या उमेदवाराला कोणताही लाभ देत नाही.म्हणून

आम्हाला असे मानण्यात अजिबात संकोच वाटत नाही की, टिप्पणी २ चे उपकलम (३) उत्तरवादी  क्रमांक १ ला कोणताही लाभ देत नाही. कारण, तो गणित विषयात ३८ पेक्षा कमी गुण मिळवून संयुक्त उत्तीर्णतेच्या फायद्यासाठी पात्र नाही. उत्तरवादी  क्रमांक १ ला, उपरोक्त तरतुदीखालील लाभ देऊ करण्यात उच्च न्यायालयाची स्पष्टपणे चूक होती.सबब, आम्ही असे मानतो की उच्च न्यायालयाने उत्तरवादी  क्रमांक १ ची रिट  याचिका मंजूर करण्यात चूक केली.परिणामत: आम्ही अपीलास परवानगी देतो आणि उच्च न्यायनिर्णयाचा आक्षेपार्ह निकाल आणि आदेश रदद् करतो आणि उत्तरवादी  क्रमांक १ ने दाखल केलेली  केलेली रिट याचिका फेटाळतो.आम्हाला कळवण्यात आले आहे की, उत्तरवादी  नंतर पुन्हा परीक्षेस बसला  आणि त्याला परीक्षेत उत्तीर्ण घोषित करण्यात आले आहे.

निकाल देण्यापूर्वी आपण असे निरीक्षण करू शकतो की, ग्रेस गुण देणे ही सवलतीची बाब आहे आणि ज्यामुळे शैक्षणिक दर्जा कमी होतो, ग्रेस गुण देण्याशी संबंधित नियमाचा उदारपणे आणि मुक्तपणे अर्थ लावला जाऊ नये.उमेदवारांना ग्रेस मार्क्सच्या माध्यमातून अनेक सवलती दिल्या जात असल्याचे आमच्या लक्षात आले आहे. उमेदवार गुण माफीच्या वेगवेगळ्या कलमांखाली ग्रेस गुण देण्यासाठी पात्र ठरू शकतो.एखादा उमेदवार अनेक कलमांखाली सवलतीसाठी पात्र असला तरीही, तो एकापेक्षा जास्त कलमांखाली ग्रेस गुणांचा दावा करू शकतो की नाही, याबद्दल शंका आहे. आमच्या समोर असा जोरदार युक्तिवाद करण्यात आला आहे की,  एखाद्याला  संबंधीत नियमाखाली  एका कलमांतर्गत ग्रेस मार्क्स मंजूर केले गेले आहेत आणि अनेक नियमांखाली, तो एकापेक्षा जास्त कलमांतर्गत ग्रेस मार्क्स देण्यासाठी पात्र

असला तरीही, कोणत्याही परिस्थितीत तो एकापेक्षा जास्त कलमांतर्गत ग्रेस मार्क्स देण्यासाठी पात्र राहणार नाही.एखाद्या उमेदवाराने राज्य पातळीवरील खेळांमध्ये भाग घेतला असेल आणि प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात आणि राष्ट्रपतींच्या रॅलीतही भाग असेल, ज्याची नोंद १ अंतर्गत कलम (२) च्या उपकलम (ड) (ई) आणि (एफ) मध्ये समाविष्ट आहे, तर अशा स्थितीत, अनुत्तीर्ण उमेदवाराला तिन्ही कलमांखाली लाभ दिला गेला, तर त्यामुळे मंडळाने घेतलेल्या परीक्षेची खरोखरच थट्टा होईल.

अपील मंजूर करण्यात आले.

=====================================================-

- -अस्वीकरण-

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारांस त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

=======================================================